Impact Factor-7.675 (SJIF)

ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

October-2021

ISSUE No- (CCCXXV ) 325

## Indian Economy: Issues & Challenges (2014 to 2021)

# INDIAN ECONOMY



Chief Editor
**Prof. Virag S. Gawande**
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
**Dr. Manjusha R. Thakre**
Organizing Secretary
Head, Dept. of Economics
Annasaheb Gundewar
College, Nagpur-13

## Annasaheb Gundewar College, Nagpur-13

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Scanned with CamScanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 325 (CCCXXV)
ISSN : 2278-9308 October, 2021

# INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | नोटबंदी : रोकडविरहित अर्थव्यवस्थेकडे वाटचाल आणि सरकारसमोरील आव्हाने | निता सखाराम खिराळे | 1 |
| 2 | वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) ही भारतीय कर प्रणालीची उत्क्रांती आहे | सावन किसन राठोड | 3 |
| 3 | भारतीय कृषी धोरणे व योजना – एक अभ्यास | प्रा.श्रीकृष्ण बी.बोढे | 6 |
| 4 | भारतीय कृषी कायदे व शेतीचा विकास -- एक मृगजळ | प्रा.पुरुषोत्तम रंगराव चाटे | 11 |
| 5 | लोकसंख्या वृद्धीचा भारताच्या आर्थिक विकासावर प्रभाव | डॉ. अश्विनी श्रीधर राऊत | 14 |
| 6 | Study of Poverty In India | Dr. J.M. Kakde | 24 |
| 7 | भारतीय अर्थव्यवस्थेच्या समस्या व प्रमुख आव्हाणे | डॉ. सुनिल शिंदे | 29 |
| 8 | महिला उद्योजकतेतून आत्मनिर्भर भारत | डॉ. रावसाहेब पिराजी इंगळे | 34 |
| 9 | भारतीय पायाभूत संरचना आणि आव्हाने | डॉ. विठ्ठल घिनमिने | 37 |
| 10 | अमर्त्य सेन यांचा जीवन परिचय व आर्थीक विचार | प्रा. डॉ. लोकचंद जाधव | 43 |
| 11 | 'कृषी विकासात प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेची भूमिका'(संदर्भ वर्धा जिल्हा) | प्रा. जगदीश वाटमोडे /डॉ. संजय धनवटे | 46 |
| 12 | वस्तू व सेवा कराचे उद्योग क्षेत्रावर परिणाम : एक आढावा | डॉ. मदन जी. प्रधान | 50 |
| 13 | नवीन कृषी कायदा : स्थिती व आव्हाने | डॉ. जयंतकुमार एम. मस्के | 53 |
| 14 | भारतातील आर्थिक विकासावर लोकसंख्या वाढीचा परिणाम | प्रतिक गोकुलदास ठाकरे | 56 |
| 15 | कोविड – 19 व भारतीय कृषी क्षेत्र | प्रा.डॉ. विनोद बागवाले | 61 |
| 16 | वस्तू व सेवा कराचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम : एक अभ्यास | डॉ. एस. पी. झांबरे | 67 |
| 17 | भारतीय अर्थव्यवस्था की चुनौति | डॉ. अजय नानाजी सरटकर | 70 |
| 18 | गरीबी और असमानता | डॉ. शमापरवीन सरफराज खान | 73 |
| 19 | 'ग्रामीण पर्यटन व्यवसाय से भारतीय ग्रामीण आर्थिक विकास –एक अध्ययन | प्रा.डॉ.ए.बी.पटले | 76 |




Scanned with CamScanner

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, NO, 325 (CCCXXV )
ISSN : 2278-9308
October, 2021

# भारतीय कृषी कायदे व शेतीचा विकास -- एक मृगजळ

**प्रा.पुरुषोत्तम रंगराव चाटे**
(अर्थशास्त्र विभाग प्रमुख)श्री.शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मोताळा, जि.बुलडाणा

**गोषवारा :-**

भारत देशामध्ये ज्याप्रमाणे विविधतेत एकता आहे. अगदी त्याच्या विरुध्द परिस्थिती शेतीक्षत्रामध्ये एकतेत प्रचंड मोठ्या प्रमाणात भिन्नता व विविधता आढळून येते. कारण या एकाच देशात वातावरणात उष्ण हवामानापासून ते थंड हवामानापर्यंतचे प्रदेश अस्तित्वात आहेत. त्याच बरोबर पर्जन्यमानात आणि पाण्याच्या उपलब्धतेत सुध्दा खूप तफावत आहे.या सर्व विविधतेमुळे आपल्या देशात अनेक पिके घेतली जातात. त्याचप्रमाणे लागवड करण्याच्या पध्दती सुध्दा भिन्न-भिन्न असल्याचे दिसून येते. या सर्व वैविध्याचा विचार करता भारत देशामध्ये एकसारखे कृषी प्रतिमान तयार करता येणार नाही. याचाच अर्थ आपली शेती विकासाची प्रक्रिया खूप गुंतागुंतीची आहे. यावास्तव स्थितीचे भान ठेवून आजपर्यंत शासनव्यवस्थेने, कृषी वैज्ञानिकांनी कृषी विकासाच्या व विस्ताराच्या कार्यक्रमांची अंमलबजावणी केल्याचे आढळून येत नाही. या चुकीच्या प्रवृत्तीमुळे भारत देश नैर्सगिक दृष्ट्या संपन्न असून धोरणकर्त्यांच्या बाबतीत पंगू आहे. म्हणून जागतिकस्तरावर कृषी बाबतीत भारत खूप पिछाडीवर आहे. कृषी क्षेत्रासमोरील आव्हाने, वास्तव परिस्थिती, विकासाची व्युहरचना आणि कायदे व धोरणांमधील सुस्पष्टता भारतीय शेतीविकासात मैलाचा दगड ठरु शकते. परंतु त्याकरिता शासनकर्ते व धोरणकर्त्याचा प्रामाणिकपणा व सचोटीने काम करण्याची गरज खूप महत्वाची असेल.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१)शेती विकासातील आव्हांनांचा अभ्यास करणे.
२) शेती विकास व ग्रामीण विकास याचा सहसंबंध तपासणे.

**संशोधनाची गृहितके :-**

१)शेतीक्षेत्रामध्ये संकटे व संधी वाढत आहे.
२) शेतीमध्ये खर्चाचे प्रमाण वाढत आहे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम साधन सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. त्यामध्ये संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे व मासिके यांचा समावेश आहे.

**प्रस्तावना :-**

कृषी व्यवसाय केवळ भारत देशातील नव्हे तर जगातील सर्वात प्राचीन व महत्वपूर्ण व्यवसाय म्हणून मान्यता पावलेला आहे. प्राचीन काळात आदिमानव फळे व कंदमुळे गोळा करुन आपला उदरनिर्वाह करत असत. सुमारे ११,००० वर्षांपूर्वी भटकंती करणाऱ्या या मानव जातीच्या समूहास असे लक्षात आले की, झाडांवरुन जमीनीवर पडणारे बियाणे पाऊस पडल्यानंतर योग्य वातावरण मिळताच रुजते व उगवते. यावरुनच अन्नधान्य प्रक्रियेचे सुरुवात झाली. जगातील मानवी वसाहतीच्या प्रथम पाऊलखुणा इजिप्त देशातील नाईल नदीच्या किनाऱ्यावर दिसुन येतात. याच ठिकाणी कृषी व्यवसायाला सुरुवात झाल्याचे दाखले इतिहासात दिसतात. या व्यवसायात पाण्याचे महत्व जोखून नाईल नदीवर पहिले धरण बांधण्यात आले. धरणातील पाण्याचा उपयोग शेतीसाठी करण्यात आला. भारत हा कृषीप्रधान देश असून शेती भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. कारण आज एकविसाव्या शतकात देखील भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष शेतीवर अवलंबून असणाऱ्या जनतेचे प्रमाण ६५% आहे. भारतचा विचार करता चीनपेक्षा लागवडीयोग्य शेतजमीन जास्त आहे. गंगा, ब्रम्हपुत्रा, यमुना, कृष्णा, गोदावरी या नद्या आहेत. विशाल असा समुद्र किनारा भारताला लाभलेला आहे. जल, जंगल व पशुधन मोठया प्रमाणावर असून पिकांच्या उत्पादनासाठी असणारे वातावरण पोषक आहे. तरी सुध्दा जगातील प्रगत राष्ट्राच्या कृषी उत्पादकतेचा विचार केल्यास भारताची कृषी उत्पादकता कमी असल्याचे दिसते. याचे मुख्य कारण आजसुध्दा भारतातील बहुतांश शेतकरी पारंपारीक पध्दतीने शेती करतात, मोठ्या प्रमाणात होत असलेले जमीनीचे तुकडीकरण, वाढती लोकसंख्या या सारख्या अनेक घटकांमुळे शेतीच्या उत्पादकतेवर प्रतिकुल परिणाम होतांना दिसतो.

**भारतीय शेतीची वास्तविकता :-**

भारतीय शेती व शेतकऱ्यांच्या विदारक परिस्थितीवर भाष्य करतांना स्वतंत्र भारताचे पहिले कृषीमंत्री डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी अतिशय परखड मत व्यक्त केले होते. त्यांच्या मते आर्थिक दृष्टीकोनातून भारतीय शेतकरी कर्जबाजारी नाही. उलट भारतीय भांडवलदार, व्यापारी सरकार यांना शेतकऱ्यांनी गेल्या शतकात एवढं प्रचंड कर्ज दिलं, की तेवढ कोणतंही सरकार देऊ शकणार नाही. मात्र या शोषिकांची कमाल ही, की यांनी शेतकऱ्यांच कर्ज परत न करता बुडवलं आणि शेतकऱ्यांनाच कर्जबाजारी म्हणून घोषित केलं. आज वर्तमान काळात कृषीक्षेत्रामध्ये अनेक स्थित्यंतरे घडलेली आहेत. परंतु तरीसुध्दा भारतीय कृषीक्षेत्र विविध संकटांनी ग्रासलेलं आहे. त्यामध्ये कधी अस्मानी, तर कधी सुलतानी संकटे चक्रिय पध्दतीने शेती व शेतकऱ्यांच्या मागे असल्याचे दिसते. भारतीय शेतीची अवस्था तर



Scanned with CamScanner

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, NO, 325 (CCCXXV)
ISSN : 2278-9308 October, 2021

**पाणी आहे, वीज नाही.**
**वीज आहे, पाणी नाही.**
**झाल्या पीकाला मोल नाही.**
**फाटक्या चप्पलीला सोल नाही.**
**तरी कोणाला आपला बोल नाही.**

वरील काव्यात शेतीचे जे विदारक चित्र उभे केले आहे, त्यापेक्षा वेगळे चित्र नाही. आज जमीनीचे मोठ्या प्रमाणात तुकडीकरण झालेले आहे. एक हेक्टरपेक्षा कमी आकारमान असलेल्याशेताचे प्रमाण ७०% पेक्षा अधिक आहे. त्या क्षेत्रात यांत्रिकीकरण किंवाआधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी मर्यादा येतात. स्वातंत्र्याच्याअमृतमहोत्सवानंतर सुध्दा शेती क्षेत्राला अनेक समस्यांनी ग्रासलेले आहे. आज किमान आधारभूत किंमत, कृषी कायदे, शेतकरी आंदोलन, कृषी मालांची नासाडी, शासनाचे उदासीन धोरण इत्यादी अनेक बाबतीत शेतकऱ्यांना ठगवले जाते.

**कृषी क्षेत्रासमोरी आव्हाने :-**

भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी त्यावेळी आचार्य विनोबा भावे यांना सांगितले होते की, ज्या राष्ट्राचा सभोवतालच्या निसर्गाशी संबंध राहत नाही, ती राष्ट्र क्षीण होतात. त्यांचा क्षय होतो. आज सुध्दा नेहरुजींचे हे वाक्य चपखल लागू पडते. आज देशामधील कृषीक्षेत्रामध्ये उदासीनता आहे. म्हणून हरितक्रांतीच्या वेळी जी चुक झाली होती ती आता करुन चालणार नाही. (Grow More Crop) कारण भौगोलिकदृष्ट्या ज्या भिन्नता आहेत, त्यामुळे शेतीच्या उत्पादनाला व पीक घेण्याला मर्यादा येतात. उदा. सोयाबीनसारखे पीक भारतामधील निवडक सहा ते सात घटकराज्यात चांगल्या प्रकारे येऊ शकते. उदा.महाराष्ट्र, मध्यप्रदेश, तेलंगाना, कर्नाटक, राजस्थान व गुजरात. त्यासाठी भारताच्या भौगोलिक गुणभिन्नतेचा विचार करुन पीकरचना कार्यक्रम तयार करणे गरजेचे ठरते. आपल्या कृषीक्षेत्रात जिरायती जमीनीचे प्रमाण ६०% पेक्षा अधिक आहे. त्याचा विचार करुन कमी पावसावर येणारे व पाण्याचा ताण सहन करणाऱ्या वाणाचे संशोधन करणे ही काळाची गरज आहे. शेतमालाच्या किंमतीसंदर्भात योग्य धोरण असावे. केवळ धोरणच असून भागणार नाही. तर त्यांची अंमलबजावणी होणे व शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळणे हे कृषी व्यवस्थेसमोर खरे आव्हान आहे. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी कागदोपत्री धोरणाची गरज नसते तर धडाडीने निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करणारे व दुरदृष्टी असणारे शासनकर्ते पाहिजे.

**शेती विकासाची दयनीय स्थिती :-**

भारतात शेती व्यवसायाचा विचार करता प्राचीन काळी उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ठ नोकरी अशी त्रिसूत्री कार्यरत होती. देशात इंग्रज सत्ता स्थापन झाल्यापासून कृषी क्षेत्राच्या शोषणाची नवनवीन दालने खुली झाली. आज ६५% जनता ग्रामीण भागात वास्तव्याला आहे. जोपर्यंत खेडी स्वयंपूर्ण होणार नाहीत, तोपर्यंत देशातील दारिद्र्य, बेरोजगारी, उपासमार, भ्रष्टाचार, अनारोग्य हे कमी होणार नाही. देशातील नकारात्मक प्रवृत्तीला समूळ नष्ट करण्यासाठी एकमेव उपाय म्हणजे कृषी विकास होय. स्वातंत्र्यानंतर पहिल्या पंचवार्षिक योजनेत शेती विकासावर जास्त भर देण्यात आला. त्यानंतर बहुतेक योजना शेती क्षेत्राला दुय्यम दर्जा देण्यात आला. बहुतांश वेळा धोरणकर्ते व राज्यकर्ते यांच्यात कृषी संबंधात गल्लत व गफलत वाढत गेली. त्याचा बळी कृषी क्षेत्र ठरले. शेती व शेतकऱ्यांचे दु:ख व दैन्यावस्था निस्तारण्यासाठी शासनकर्त्यांना शेती विकास म्हणजे ग्रामीण विकास व ग्रामीण विकास म्हणजे शेती विकास हे समीकरण समजणार नाही, तोपर्यंत शेती व शेतकऱ्यांचे शोषण होत राहणार हे सांगण्यासाठी कोणत्याही तत्ववेत्त्यांची गरज नाही. देशात शेतीविकासाच्या मुख्य कार्याला बगल देऊन एकात्मिक ग्रामीण विकास, इंदिरा आवास योजना, स्वर्णजयंती, स्वयंरोजगार, बेरोजगार भत्ता, पंतप्रधान घरकुल असे आणि यासारख्याअसंख्य योजना चालविल्या जात आहेत. सरकार कोणतेही असले तर योजनांचा कालावधी व योजनांचे नाव बदलुन बाळसे केले जाते. आमच्या जगण्यात आनंद, हवेहवेसापणा मग शेतकऱ्यांच्या जीवनात या सर्व गोष्टी कधी येणार? त्या येण्यासाठी योग्य उपाय व अंमलबजावणी करण्याची सूबुध्दी आमच्या धोरणकर्त्यांना कधी येणार? ही कृषी विकासामधील खरी मेख आहे. कारण राज्यकर्त्यांच्या सत्तापिपासू व स्वार्थी धोरणाच्या त्यागाशिवाय शेती विकासाचा सुदिन उजाडणार नाही.

**शेतीविषयक कायदे व संभ्रम :-**

स्वातंत्र्यानंतर कृषी व्यवसायाचा विकास करण्यासाठी अनेक कृषी कायदे निर्माण करण्यात आले. शेतकऱ्यांचे शोषण करणारे अनेक कायदे रद्द देखील करण्यात आले. त्याचप्रमाणे कमला जमीन धारणा सिलिंग ॲक्ट असे शेतकरी हिताचे नवीन कायदे अंतर्भूत करण्यात आले. जागतिकीकरणाच्या स्विकारानंतर कृषीमध्ये नवनवीन प्रवाह उदयास आले. शेती व शेतकऱ्यांच्या फायद्याच्यादृष्टीने कायद्यामध्ये कमी अधिक संभ्रमावस्था दिसून येते. भारत देशात २०२० मध्ये तीन नवीन कृषी कायदे पारीत करण्यात आले. त्यामध्ये

१) शेतकरी उत्पादने, व्यापार, वाणिज्य (प्रोत्साहन व सुविधा) कायदा २०२०
२) शेतकरी (सशक्तीकरण आणि संरक्षण) किंमत आश्वासन आणि कृषी सेवा करार कायदा २०२०
३) अत्यावश्यक वस्तू (दुरुस्ती) कायदा २०२०

या तीन कायद्यांचा समावेश आहे. वरील कायद्यांविरोधात शेतकरी मागील १ वर्षापासून कोरोनासारख्या महामारीत सुध्दा आंदोलन करीत आहेत. ज्यामध्ये अनेक शेतकऱ्यांचे बळी गेले आहेत. वास्तव शेतकरी कायदे शेतकऱ्यांच्या हितासाठी असतील तर त्याला



Scanned with CamScanner

विरोध का होत आहे. शेतकऱ्यांना शासन कायदे समजावून देण्यात अपयशी ठरले का? या कायद्यामुळे शेतकऱ्यांच्या मालकीच्या जमीनी धनदांडगे लोक बळकावतील का? पुन्हा कंपनी सरकार स्थापन होईल का? अशा संभ्रमावस्थेमुळे शेतकरी आंदोलन करीत नसतील ना? या प्रश्नाचा योग्य अभ्यास करुन सरकारने शेतकरी बांधवांच्या मनातील गैरसमज दूर करणे गरजेचे आहे. कारण शेती देशातील असंघटीत लोकांचा सर्वात मोठा खाजगी व्यवसाय असला तरी, असंख्य अकुशल लोकांना रोजगार पुरविणारा आधारस्तंभ आहे याचे भान सरकारने ठेवणे गरजेचे आहे.

**संदर्भग्रंथ :-**

१) अतुल देऊळगांवकर, ऑक्टोबर २०१२, "विश्वाचे आर्त", मनोविकास प्रकाशन, पुणे.
२) डॉ.चित्रलेखा पुरंदरे, डीसेंबर २०१९ "सेंद्रिय शेतीची यशोगाथा",विश्वकर्मा प्रकाशन, पुणे.
३) डॉ.निता वाणी, जून २०१२, "कृषी अर्थशास्त्र", प्रशांत पब्लिकेशन, जळगांव
४) मनोज हाडवळे, जून २०१८, "कृषी पर्यटन-एक पुरक व्यवसाय" सकाळ प्रकाशन, पुणे.
५) डॉ.रामेश्वर भिसे, नोव्हेंबर २०११, "कृषी अर्थशास्त्र", प्रशांत पब्लिकेशन, जळगांव.
६) डॉ.रामचंद्र साबळे, ऑगस्ट २०१८, "शेती व हवामान बदल", सकाळ प्रकाशन, पुणे.
७) श्री.रमेश पाध्ये, मार्च २०१५, "शेती, शेतकरी आणि अर्थकारण", द युनिक अकॅडमी, पुणे.
८) श्री.रमेश पाध्ये, मार्च २०१६, "दुष्काळाला भिडतांना", द युनिक अकॅडमी, पुणे.
९) डॉ.सुधाकर देशपांडे, डीसेंबर २००५, "कृषी भारत निर्माण", पायगुण प्रकाशन, अमरावती.

**वर्तमानपत्रे :-**

१) लोकसत्ता दि.१४ सप्टेंबर २०२१.
२) सकाळ, दि.२४ डिसेंबर २०२०.



Scanned with CamScanner

# Aadhar Social Research & Development Training Institute, Amravati.

## Indian Economy: Issues & Challenges (2014 to 2021)

## International Conference Special Issue

# CERTIFICATE

ISSN 2278-9308

Impact Factor 7.675 (SJIF)

*This is to certify that Prof./Dr./Mr./Mrs./Ms.* ........ प्रा.परुषोत्तम रंगराव चाटे ........

*Of* (अर्थशास्त्र विभाग प्रमख)श्री.शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मोताळा, जि.बलडाणा ........

*has published a paper on* ........ भारतीय क षी कायदे व शेतीचा विकास -- एक मगजळ ........

*Peer Reviewed International Research Journal* **B.Aadhar** *Issue* no,(CCCXXV) 325. *Published*

on *Dated* 30, October- *2021*

*Prof. Virag Gawande*
*Director*
*Aadhar Social Research &*
*Development Training Institute,Amravati*

Scanned with CamScanner

Village Uplift Society's

# ANNASAHEB GUNDEWAR COLLEGE

Gundewar Marg, Katol Road, Nagpur-13

## Department of Economics

### International e-Conference

### Indian Economy:Issues & Challenges (2014 to 2021)

### *E-Certificate of Participation*

**This is to certify that Prof./Dr./Mr./Mrs./Ms.** Purushottam Rangrao Chate **of** Shri Shivaji Arts,Commerce & Science College Motala **has participated in the** *Online One Day International e-Conference* **on 'Indian Economy:Issues & Challenges (2014 to 2021)' organized by Department of Economics, Annasaheb Gundewar College, Nagpur on Dated 26 October 2021.**

M. R. Thakre

**Dr. Manjusha Thakre**
**Convenor & Organising Secretary**
**Head, Dept. of Economics**
**Annasaheb Gundewar College, Nagpur**

S.B.Patil

**Dr. Gajanan Patil**
**Principal**
**Annasaheb Gundewar College, Nagpur**

Made for free with Certify'em

Scanned with CamScanner